महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ</u>

क्र.एएससी १५१८/प्र.क्र.७४/१४-अ,
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.२२७९४१७२/२२७९३३४४
दिनांक : २८ मार्च, २०१८

प्रति,

सह/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय:- विविध कार्यालयातील रिक्त पदे प्रतिनियुक्ती भरण्याबाबत.

संदर्भ:- १) सा.प्र.वि. शा.नि. क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/का. १२, दिनांक १७-१२-२०१६.
२) सा.प्र.वि. शा.नि. क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१२०/कार्या-१४, दिनांक ३१-०८-२०१७.

महोदय/महोदया,

संदर्भाधिन क्र. १ येथील दिनांक १७-१२-२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून, संदर्भ क्र.२ येथील दिनांक ३१-८-२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीबाबत कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार मंत्रालयीन विभागातील सहायक कक्ष अधिकारी व लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांकडून खालील तक्त्यातील **स्तंभ क्र.५** येथील कार्यालयातील रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता इच्छुकता मागविण्यात येत आहे :-

अ.क्र.	पदाचे नांव व वेतनश्रेणी	मंत्रालयीन संवर्ग	प्रतिनियुक्तीने भरावयाचे पदांची संख्या	प्रतिनियुक्तीचे ठिकाण
१	**२**	**३**	**४**	**५**
१	वरिष्ठ भांडारपाल (वेतनश्रेणी रुपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रुपये ४२००/-	सहायक कक्ष अधिकारी	१	विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई.

२	सहायक (वेतनश्रेणी रुपये रुपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रुपये ४३००/-	सहायक कक्ष अधिकारी	२	संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर
२	लिपिक (वेतनश्रेणी रुपये रुपये ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रुपये १९००/-	लिपिक-टंकलेखक	३	संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर

२. उपरोक्त पदावर प्रतिनियुक्तीने जाण्याकरिता इच्छुक मंत्रालयीन विभागातील सहायक कक्ष अधिकारी, व लिपिक टंकलेखक यांनी आपल्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे अर्ज सादर करावा कोणत्याही परिस्थितीत या विभागाकडे थेट अर्ज करु नयेत. थेट प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

३. संदर्भाधिन क्रमांक १ व २ येथील शासन निर्णयातील तरतूदीपहाता, विमानचालन संचालनालयातील आस्थापनेवर "**वरिष्ठ भांडारपाल**" व संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर यांच्या आस्थापनेवर **"सहायक"** व **"लिपिक"** पदांसाठी ज्या कर्मचाऱ्यांची या कार्यालयाने प्रतिनियुक्तीबाबत शिफारस केली आहे त्या कर्मचाऱ्यांचा प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही. यास्तव, त्या कर्मचाऱ्यांनी या जाहिरातीनुसार त्यांच्या प्रशासकीय विभागाकडे पुन:श्च अर्ज सादर करावेत.

४. सर्व संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी इच्छुक कर्मचाऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतूदीनुसार अर्जांची छाननी करुन खालील माहितीसह आपल्या विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने इच्छुक कर्मचाऱ्याचा प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव खालील माहितीसह या कार्यासनाकडे दिनांक ०७-०४-२०१८ पर्यंत पोहोचतील अशारीतीने (नोंदणी शाखेत पाठवू नये) पाठवावा :-

१)	कर्मचाऱ्याचे संपूर्ण नांव व पदनाम	
२)	जन्मदिनांक	
३)	सेवानिवृत्तीचा दिनांक (पहा शा.नि.दिनांक १७-१२-२०१६ मधील तरतुद ५ (ब) (६)	
४)	शैक्षणिक अर्हता	
५)	भ्रमणध्वनी क्रमांक	
६)	मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत)	

७)	मत्ता व दायित्व सादर केली आहेत का? (दि.३१.३.२०१७ रोजीचे)	
८)	५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का? (लागू असल्यास)	
९)	संबंधित कर्मचाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास तपशील (पद, ठिकाण व कालावधी)	
१०)	संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे काय?	

५. एकदा निवड झालेल्या कर्मचाऱ्याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही. तसेच, आपल्या विभागातून सदर पदावर **प्रतिनियुक्तीसाठी जाण्यास कोणीही कर्मचारी इच्छुक नसल्यास तसेही कृपया दिनांक ०७-०४-२०१८ पर्यंत या विभागास कळविण्यात यावे.**

६. सद्य:स्थितीत शासनाने सरळसेवा भरतीवर निर्बंध घातले असल्याने प्रतिनियुक्तीने रिक्त होणाऱ्या पदावर तत्काळ कर्मचारी उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. तथापि सरळसेवा व पदोन्नतीमधून ज्या प्रमाणात उमेदवार उपलब्ध होतील त्या प्रमाणात विभागातील रिक्त पदांच्या टक्केवारीनुसार विभागास त्या-त्या संवर्गातील कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात येतील याची विभागांनी नोंद घ्यावी.

७. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवरील संदेशफलक या टॅबखाली प्रसिध्द करण्यात येत आहे.

८. विमानचालन संचालनालयातील "वरिष्ठ भांडारपाल" या पदाचे सेवाप्रवेश नियिम व कर्तव्य व जबाबदाऱ्या सोबत जोडण्यात आले आहे संबंधित कर्मचाऱ्याने त्याचेही अवलोकन करुन अर्ज सादर करावा.

९. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३३११०३९२६४९०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

आपला,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0,
serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.03.31 10:42:40 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) उप सचिव (कार्यासन -२८-अ/कार्यासन १२-अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

२) सा.प्र.वि./१४-अ (संग्रहार्थ)

1471 - 1

9०७५

विमानचालन संचालनालय, महाराष्ट्र
शासन, जुहू विमानतळ, मुंबई.

पदनाम : वरिष्ठ भांडारपाल

वेतनश्रेणी : रु.9300-34800 + ग्रेड वेतन 4200/-

वरिष्ठ भांडारपाल या पदाचे सेवाप्रवेश नियम :

अ) संचालनालयातील कनिष्ठ भांडापाल या पदावरील / संवर्गातील पाच वर्षापेक्षा कमी अनुभव नसलेल्या योग्य उमेदवाराची पदोन्नतीने नियुक्ती.

ब) मंत्रालयातील सहायक कक्ष अधि कारी या संवर्गातील योग्य उमेदवाराची प्रतिनियुक्तीने बदलीवर नियुक्ती.

कर्तव्ये :

1. शासनाच्या मालकीच्या हवाई वाहनांच्या सुट्टया भागासंदर्भात संपुर्ण गोषवारा ठेवणे.
2. संबंधित उत्पादक कंपनीकडून वेळोवेळी प्राप्त होणारे सुट्टे भाग आंतरराष्ट्रीय विमानतळावरील कार्गो सेक्शनमध्ये जाऊन कस्टमड्युटी, ऑक्ट्राय यासंदर्भातील सर्व प्रक्रिया पुर्ण करुन सदर सुट्टे भाग जुहू येथील कार्यालयात आणून त्यांच्या वर्गवारीनुसार त्याची नोंद करुन योग्य खणात ठेवणे.
3. संबंधित सुट्टया भागांसंदर्भात वेळोवेळी आवश्यक असलेले डी.जी.सी.ए. प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे.
4. केंद्र शासनाच्या डी.जी.सी.ए. या प्राधिकरणामार्फत संचालनालयाच्या भांडारशाखेच्या लेखापरिक्षणासंदर्भात भांडारशाखेची तसेच नोंदवह्यांची अद्ययावत स्थिती राखणे.
5. शासनाच्या हवाई वाहनासाठी तातडीने लागणारे सुटे भाग आंतरराष्ट्रीय कार्गो संकूलामधून अल्प सूचनेवर तातडीने सोडवून घेऊन ते हवाई वाहनाची देखभाल करणाऱ्या संबंधित कंपनीच्या हँगरमधील संबंधीतांकडे पोहोचते करणे.
